# संपादकीय

बायजाचा सप्टे–ऑक्टो. ८१ चा हा अंक वाचकांच्या हातात उशीरा पडत आहे याबद्दल आम्ही दिलगिरी व्यक्त करत आहोत. प्रेसच्या व इतर काही तांत्रिक अडचणीमुळे हा अंक उशीरा निघत आहे.

आर्थिक आणि सामाजिक जीवनातील अरिष्टे दिवसेंदिवस तीव्र आणि भयानक उग्र स्वरुप धारण करीत आहेत.

भ्रष्टाचाराची लहानमोठी प्रकरणे नेहमीच उघडकीला येत असतात. कधी त्यामध्ये आरोपींना शिक्षा होते तर कधी आरोपी सुटून समाजात राजरोसपणे वावरत रहातात. इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठानला मिळालेल्या देणग्या, सिमेंटचे परवान्याबाबतचे गैरव्यवहार उघडकीला आले आहेत. संसद आणि महाराष्ट्र विधान सभेचे अधिवेशनही या दोन प्रकरणामुळे गाजले. या भ्रष्टाचाराविरुद्ध एवढी संतापाची लाट उठूनही सत्ताधारी पक्ष व वर्गाने अनेक प्रकारांनी या दोन्ही प्रकरणांचे समर्थन केले आहे ही अतिशय चिंतनीय बाब आहे.

आसाम, त्रिपुरा, मणिपूर इ. भागातील फुटीरतावादी आंदोलनाची लाट किंचित कमी होऊ लागली आहे तोच पंजाबमध्ये शीख पंथियांनी ' खलिस्तानची मागणी केली आहे. आणि पुन्हा नव्या स्वरुपात, नव्या भागात फुटीरतावादाचे आक्रमक आव्हान धर्मवेडचा सनातन्यांकडून उभे राहिले आहे.

जनतेच्या साध्या साध्या मागण्या, रोजच्या जीवनातल्या आवश्यक गोष्टीही सध्या मिळत नाहीत, अशा वेळी जनतेचा संताप उग्र स्वरुप धारण करतो हे साहजिकच आहे. मुंबईला ऐन दसरा व ईद या दोन्ही दिवशी निम्म्याहुन अधिक मुंबईकरांना पाणी मिळाले नाही. दसरा व ईद जोडून आले होते. सणाचा, सुट्टीचा आनंद लुटता आला नाही. उलट पाण्यासाठी धावाधाव करावी लागत होती. या सर्वाचे पर्यवसान ' रस्ता रोको ' आंदोलनात झाले, या आंदोलकांवर गोळीबार होऊन त्यात एकजणाचा बळी गेला. गोळीबार करण्यापूर्वी जमावाला पांगवण्याचा प्रयत्न म्हणून अश्रुधूर सोडावा लागतो. गोळीबार होत असल्याची पूर्वसूचना द्यावी लागते. परंतु मुंबईत मात्र अश्रुधूर वा कसलीही पूर्वसूचना न देता गोळीबार करण्यात आला. गोळीबार न करताही जमाव पांगवता आला असता. पोलिसांची दंडुकेशाही किती आक्रमक ठरत आहे याचे हा गोळीबार उत्तम उदाहरण आहे. या गोळीबारानंर मुंबईच्या पाणीपुरवठा व्यवस्थेबद्दल बऱ्याच गोष्टी पुढे आल्या. पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन ब्रिटीशकालीन आहे. तिथे बऱ्याच डागडुजीची किंबहुना नवीन पाईपलाईन घालण्याची गरज आहे. दसऱ्याच्या वेळेला पाईप लाईन नादुरुस्त झाली. तर दुरुस्त करण्यासाठी आवश्यक असलेले नकाशेही महानगरपालिकेत सापडले नाहीत. साध्या साध्या प्रश्नावरूनही शासनाकडून जनतेची सहनशक्ती दिवसेंदिवस अधिकाधिक ताणली जात आहे.

याबरोबरच वेगवेगळचा जमातीतील स्त्रियांवर जुनी बंधने नव्या स्वरुपात घातली जात आहेत. गेल्या ४।५ महिन्यात बऱ्याच ठिकाणी मुस्लीम व शीख धर्मीय स्त्रियांवर त्या पंथातील पुरुषांनी चित्रपट पहाण्यास बंदी आणली आहे. अशी बेकायदा बंधने स्त्रियांवर लादणे निश्चितच देशातील लोकशाहीला घातक आहे.

गेल्या २।३ महिन्यात विशेषतः संपबंदी वटहुकूम

आल्यापासून देशातील मध्यवर्ती कामगार संघटनानी एकत्र येऊन कामगारांच्या प्रश्नावर त्यांच्या लोकशाही हक्कासाठी एकजुटीने लढा चालवला अ.हे, आंदोलने उभी केली जात आहेत. याच प्रयत्नांचा भाग म्हणून महाराष्ट्रात कामगार संघटना संयुक्त कृति समितीतर्फे असंघटित कामगारांची परिषद ११ ऑक्टो. ला मुंबई येथे झाली. आज असंघटित क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण व संख्या मोठी आहे. असंघटित कामगार परिषदेत स्त्री कामगारांची उपस्थितीही लक्षणीय होती. असंघटित कामगार परिषदेत शेतमजूरांच्या व अन्य कामगारांच्या किमान वेतनाचा प्रश्न चर्चिला गला व त्यासंबंधी मागण्या मांडण्यात आल्या. त्या दृष्टोने असंघटित कामगार परिषदेचे स्वागतच करायला हवे. असंघटितांचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे आणि एका व्यापक लढ्याची नांदी चालू झाली आहे. बलात्कार, हुंडा आणि इतर सामाजिक प्रश्नांवरही स्त्रियांची संघटित चळवळ पुढे सरकत आहे.

स्त्रिया व कामगाराबरोबरच विद्यार्थी युवक आता बेकारी, शैक्षणिक प्रश्न, भ्रष्टाचार, अंधश्रद्धा इ. विरोधात आंदोलने उभी करू लागला आहे. संसदेवर नुकताच सत्तर हजार विद्यार्थी युवकांचा मोर्चा गेला होता. विविध प्रांतात अंधश्रद्धा विरोधातही विज्ञाननिष्ठांचे लढे चालू आहेत.

१९८१ सालातील एक घटना विशेष नमूद करण्यासारखी आहे! १९८१ साल जाहीर झालंय अपंग वर्ष म्हणून. पुण्यातल्या काही जिद्दी अपंग तरुण तरुणींनी जागृत अपंग संघटना स्थापन केलीय. या संघटनेला अपंगांची संघटना म्हणून लोकांचा दयाभाव नको आहे. जत्रांमध्ये पैशासाठी अपंगांचं प्रदर्शन केलं जातं त्याविरुद्ध या संघटनेनं आवाज उठवलाय. माणसाला येणारं अपंगत्व हे त्याच्या नशीबामुळे येत नसून आजची आर्थिक सामाजिक व्यवस्था हजारोंच्या अपंगत्वाला जबाबदार आहे असं ही संघटना मानते आणि म्हणूनच तिचं नातं एकूण सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याशी जोडते. हा प्रयत्न फक्त पुण्यापुरता मर्यादित असेल पण या जिद्दीने या अपंग तरुण तरुणींनी या संघटनेचे कार्यक्रम चालवले आहेत ते पहाता असे प्रयत्न धडधाकट व्यक्तिनाही स्फुर्तिदायक ठरावेत. बायजातर्फे जागृत अपंग संघटनेच्या प्रयत्नाचं आम्ही मन:पूर्वक अभिनंदन करतो.

१९८१ साल संपत आलंय, रासुका कायदा, संपबंदी वटहुकूम भ्रष्टाचार यानं हे वर्ष गाजलं पण वेगवेगळ्या लढ्यांची तीव्रता मंदावलेली नसून ती झपाट्याने वाढते आहे. आणि हीच गोष्ट आशावाद निर्माण करणारी आहे.

□ □ □

---

## विशेष सूचना –

(१) बायजाची वार्षिक वर्गणी ९ रु. आहे. ज्यांची वर्गणी संपली आहे त्या वर्गणीदारांनी हेच स्मरणपत्रक समजून वर्गणीचे नूतनीकरण त्वरीत करावे.

(२) वर्गणी पाठविण्याचा पत्ता–
सौदामिनी राव, संपादक बायजा
'निधि', ९७, प्रभात रोड, एरंडवणा, पुणे ४

(३) 'बायजा' द्वैमासिकाचा दोन महिन्याचा काळ संपून १५ दिवसातही अंक न आल्यास वर्गणीदारांनी वरील पत्त्यावर संपर्क साधावा. अंक शिल्लक असल्यास अवश्य पाठविला जाईल.